# देशाच्या सीमा ओलांडणारी कादंबरी

## लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'इन्क्लाब विरुद्ध जिहाद'वरील चर्चासत्रातील सूर

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : मराठी कादंबरी विश्वात मोजक्या कादंबऱ्यांनी भारतीय सीमा ओलांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात लक्ष्मीकांत देशमुख यांनी लिहिलेल्या 'इन्कलाब विरुद्ध जिहाद' या कादंबरीने देशाच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रश्नाला हात घातला आहे. त्यामुळे या कादंबरीचे मोल वाढते आहे, असा सूर सेवानिवृत्त जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी लिहिलेल्या 'इन्कलाब विरुद्ध जिहाद' या पुस्तकावर झालेल्या चर्चासत्रात निघाला.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे शाहू स्मारक भवनाच्या मिनी हॉलमध्ये कार्यक्रम झाला. प्रा. डॉ. अशोक चौसाळकर अध्यक्षस्थानी होते. समिक्षक डॉ. अविनाश सप्रे,



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे शनिवारी शाहू स्मारक भवनच्या मिनी हॉलमध्ये झालेल्या 'इन्क्लाब विरुद्ध जिहाद' या पुस्तकावरील चर्चासत्रात बोलताना अन्वर राजन. शेजारी डॉ. राजन गवस, लेखक लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अविनाश सप्रे, प्रा. रणधीर शिंदे.**

लेखक अन्वर राजन, साहित्यिक डॉ. राजन गवस, लक्ष्मीकांत देशमुख आदींनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

डॉ. सप्रे म्हणाले, ''अफगाणिस्तानची संस्कृती, तेथील धार्मिक कट्टरता, धर्मपालनाची सक्ती, वर्चस्वासाठी सुरू असलेला संघर्ष त्याचे परिणाम अशा ज्वालाग्रही तितक्याच स्फोटक विषयावर समतोल पद्धतीने श्री. देशमुख यांनी लेखन केले आहे. त्यातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील परिणामांचे अंतरंग उलगडतात. धार्मिक कट्टरतावाद व टोकाचा साम्यवाद अनेकदा धोकादायक ठरतो. यातून वेळीच सावरणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मानवी मूल्यांचे संवर्धन करावे लागेल, असा सूर कादंबरीने दिला आहे.''

अन्वर राजन म्हणाले, ''प्रत्येक देशाची स्वतःची संस्कृती तयार होते. त्या संस्कृतीचा प्रभाव लोकसमुदायावर असतो. जाती-धर्मावरही असतो. तो अफगाणिस्तानातही दिसतो. मुस्लिमबहुल भाग असला तरी त्यात अंतर्गत जातीधर्माच्या शाखा, उपशाखा, जगण्याच्या पद्धती भिन्न आहेत. त्यातून कोणी कोणावर वर्चस्व दाखवावे, असा मुद्दा निर्माण होतो. अशात भेद टोकाला गेल्याने संघर्षाच्या ठिणग्या उडतात. अशा ठिणग्या अफगाणिस्तानातून जशा इतरत्र गेल्या, तशा आपल्या देशातही पोचल्याचे दिसते. याची जाणीव कादंबरीतून होते.''

श्री. देशमुख म्हणाले, ''जगाच्या पटलावर दहशतवादाचे आव्हान ठळक आहे. धार्मिक कट्टरतेचे आकर्षण वाढते आहे. त्यामुळे 'आम्ही जे सांगतो तेच तुम्ही एकले पाहिजे' अशी सक्तीची भाषा वाढत आहे. त्यामुळे वैचारिक मतभेद बाजूला पडून सक्ती केली जाते. तरीही ऐकले नाही तर बेदखल करण्याचे किंवा मारण्याचे कृत्य केले जातात. हा सामाजिक धोका आहे. अशा टोकाच्या भूमिकेतून होणाऱ्या नुकसानापासून वेळीच सावध राहणे अपेक्षित आहे. या विचारातून कादंबरी आकारास आली.''

या वेळी डॉ. गवस यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

### धार्मिक कट्टरतेच्या परिणामांची मांडणी...

**डॉ. चौसाळकर म्हणाले, ''धार्मिक व राजकीय संघर्षाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील संदर्भ या कादंबरीत असले तरी त्यातील मूळ गाभा धार्मिक कट्टरतेपासून जीवनशैलीवर होणारा परिणाम असा आहे. त्यामुळे व्यापक विषय, विविध संदर्भाने अधिक तपशीलवार मांडणीने वाचकांसमोर येण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कादंबरी चार खंडांत व्हावी, अशी अपेक्षा आहे.''**

2 9 MAY 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आव्हान’द्वारे विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन धडे!

**प्रशिक्षण शिबिराचा १ जूनला प्रारंभ**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १ ते १० जूनदरम्यान ‘आव्हान’ राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे मिळणार आहेत.

नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्ती उद्‌भवल्यास कशा पद्धतीने सामोरे जायचे, व्यवस्थापन कसे करायचे, याबाबत राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यंदा शिवाजी विद्यापीठाकडे शिबिर संयोजनाची जबाबदारी आहे. प्रशिक्षण शिबिरात पुणे येथील राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद दलातर्फे एनएसएसच्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. यात १,२०० हून अधिक कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

> यावर्षी विद्यापीठात होणाऱ्या ‘आव्हान’ प्रशिक्षण शिबिराची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, विविध २७ समित्यांचे कामकाज सुरू आहे. यापूर्वी २००७ मध्ये विद्यापीठाने ‘आव्हान’चे संयोजन केले होते. नागपूर येथे झालेल्या ‘आव्हान’मध्ये जनजागरण फेरीत उत्कृष्ट विद्यापीठाचा फिरता चषक विद्यापीठाने पटकावला होता.
>
> – डॉ. डी. के. गायकवाड, ‘एनएसएस’ समन्वयक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 MAY 2017
पुढारी

# पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पदव्युत्तर विभागातील नियमित अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दि. २७ पासून ऑनलाईन अर्ज मागविण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येत आहेत. यावर्षी एम.ए. सर्व विषय (भूगोल व मास कम्युनिकेशन विषय सोडून), एम.कॉम., एल.एल.एम. व सर्व पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. दि. ९ जून अर्ज प्रक्रियेची मुदत आहे. विद्यापीठाच्या https://online.shivajiuniversity.in संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. अर्ज भरण्यासाठी पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध आहे. अर्जाची हार्ड कॉपी, भरलेल्या शुल्काची पावती अथवा पेमेंट गेटवे रिसीट पान २ वर

पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रक्रियेस प्रारंभ

(पान १ वरून) त्या-त्या विभागात योग्य त्या कागदपत्रासह दि.१३ जूनपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी पदव्युतर विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही.डी.नांदवडेकर यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठ लोगो वापरावा